20110111185504001

पुणे महानगरपालिका

सन १९८९-९० मध्ये समारंभ प्रित्यर्थ झालेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीएमसी ३०९०/१५३२/प्र.क्र.१८५/९०/नवि २२
मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दिनांक :- ११ डिसेंबर १९९०.

वाचा :- १] शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, क्र.जीईएन-१०८७/२७८/सीआर ३०/नवि २१, दिनांक २६ जून १९८७.

२] आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे पत्र क्र.मआ/[illegible] नसजा/३१४५, दिनांक १६ ऑगस्ट १९९०.

निर्णय

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक जीईएन-१०८७/२७८/[illegible] सीआर ३०/नवि २१, दिनांक २६ जून १९८७ नुसार महानगरपालिकांनी समारंभ प्रित्यर्थ रुपये १ लाखापेक्षा जास्त खर्च करु नये असे सुचित केले आहे.

२. सन १९८९-९० या वर्षामध्ये पुणे महानगरपालिकेने अशा समारंभाप्रित्यर्थ केलेल्या खर्चाची मर्यादा ओलांडली आहे. वास्तव, प्रसिध्दीपत्रकामधील मर्यादा रुपये १ लाखाऐवजी रु.१,२७,४०८-८१ एवढा खर्च केला आहे. या मर्यादेबाहेर गेलेल्या खर्चास मंजुरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. या निर्णयाव्दारे पुणे महानगरपालिकेने रु.एक ~~लक्ष~~ लक्षाची मर्यादा ओलांडून जास्त म्हणजे रु.२७,४०८=८१ [रुपये सत्याण्णव हजार चारशे आठ व पैसे एक्याऐंशी फक्त] या जास्त झालेल्या खर्चास खास बाब म्हणून ~~कक्षेने~~ कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेपुरती वरील एक [illegible] रुपयांच्या खर्चाची मर्यादा रुपये १,२७,४०८-८१ एवढी सन १९८९-९० या वर्षासाठी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही विशेष मंजुरी सन १९८९-९० या आर्थिक वर्षापुरतीच मर्यादीत आहे.

४. यापुढे शासन अधिसूचना क्रमांक ~~जब~~ जीईएन-१०८७/२७८/सीआर ३०/नवि २१, दिनांक २६ जून १९८७ नुसार अशा खर्चाची जी मर्यादा ठेवली आहे तोपर्यंतच पुणे महानगरपालिकेने खर्च करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या ~~अदेश~~ आदेशानुसार व नांवाने,

[signature]
[घ.नं.तलरेजा]
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रत :

आयुक्त,